महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

Rs.2/-

शुक्रवार ■ ०८ ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०४८ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# तांत्रिक शिक्षणाबरोबरच व्यक्तिमत्व विकास

## आयटीआयमध्ये वीस नव्या अभ्यासक्रमांचा समावेश - कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : 'महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता व नाविन्यता धोरण २०२५' अंतर्गत मुख्यमंत्री उद्योजकता व नाविन्यता महाफंड' योजना राबविण्यात येणार असून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती केली जाईल. पुढील पाच वर्षात सव्वा लाख उद्योजक आणि ५० हजार नवउद्यमींना (स्टार्टअप) मान्यता देण्यात येईल. राज्यातील आयटीआयमध्ये तंत्रशिक्षणाबरोबरच व्यक्तिमत्व विकासाचे २० अभ्यासक्रम १५ सप्टेंबरपासून सुरु करण्यात येतील, असे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी पत्रकारपरिषदेत सांगितले.

शासनाकडे तंत्रशिक्षण घेतलेल्या ३० लाख युवक-युवतींची नोंद आहे. त्यांची कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करुन परीक्षा घेतली जाईल आणि पाच लाख जणांची निवड होईल. मूल्यांकन चाचण्या, स्पर्धा व हॅकेथॉनच्या माध्यमातून पुन्हा चाळणी करून एक लाख उमेदवारांची निवड केली जाईल. अंतिम टप्प्यात २५,००० निवडक उमेदवारांना त्यानंतर तांत्रिक सहाय्य, आर्थिक मदत आणि प्रशिक्षण देऊन यशस्वी उद्योजक, स्टार्टअप्स तयार करण्याचे उद्दिष्ट आहे.



नवीन धोरणाची अंमलबजावणी राज्य नाविन्यता सोसायटी मार्फत केली जाणार असून महाराष्ट्राला भारतातील सर्वात गतिशील व भविष्यवेधी स्टार्टअप केंद्र म्हणून उभारण्याचा उद्देश आहे. शहरी, ग्रामीण, महिला आणि युवा उद्योजकांसह सर्व क्षेत्रांतील उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि वंचित समुदायांवर लक्ष केंद्रित केले जाईल. निवडलेल्या उमेदवारांना वित्तीय संस्थांच्या भागीदारीतून पाच ते दहा लाख रुपयांचे कर्ज सहाय्य दिले जाईल. त्यासाठी पाच वर्षांच्या कालावधीसाठी ५०० कोटी रुपयांचा निधी उभारला जाईल.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मृतीदिनानिमित्त मुंबईत 'ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव पारंपरिक क्रीडा महाकुंभचे आयोजन १३ ते २२ ऑगस्ट दरम्यान करण्यात येणार आहे. त्यात मुंबईकरांना पारंपरिक खेळांचा थरार पाहायला मिळणार आहे. या क्रीडा महाकुंभच्या माध्यमातून लेझिम, फुगडी आणि लगोरी, विटी दांडूसह शिवकालीन पारंपरिक खेळांना पुन्हा वैभव मिळवून देणार आहे.

पारंपरिक खेळांच्या या क्रीडा महाकुंभात कब्बडी, खो-खो, लगोरी, लेझीम, रस्सीखेच, मल्लखांब, पावनखिंड दौड, कुस्ती, पंजा लढवणे, विटी-दांडू, दोरीच्या उड्या, फुगडी आणि योग या क्रीडा प्रकारात महिला आणि पुरुष गटातील सामन्यांचे आयोजन करण्यात आले आहे. कुर्ला इथे जामसाहेब मुकादम शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या मैदानात होणाऱ्या या क्रीडा महाकुंभात ही जनतेने सहभागी व्हावे असे आवाहन लोढा यांनी केले आहे.

### आयटीआय मध्ये 20 नवीन अभ्यासक्रम

राज्यभरातील आयटीआय मध्ये लघु कालावधीचे २० नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असून तांत्रिक शिक्षणाबरोबरच इतर अनुशंगिक व्यक्तिमत्व विकासाचे अभ्यासक्रम १५ सप्टेंबर पासून सुरू होणार आहेत. त्यातून विद्यार्थ्यांना रोजगार मिळविण्यासाठी अधिक कौशल्य प्राप्त होईल. आयटीआय मध्ये व्यवस्थापन क्षेत्रातील बिझनेस अ ॅनालिटिक्स हा चार महिने कालावधीचा अभ्यासक्रम, मार्केटिंग मॅनेजमेंट तीन महिने कालावधीचा अभ्यासक्रम, प्रॉडक्शन मॅनेजमेंट साडे तीन महिने कालावधीचा अभ्यासक्रम, फायनान्शियल मॅनेजमेंट तीन महिने कालावधी, बिहेव्हियरल मॅनेजमेंट साडे तीन महिने कालावधींचे अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. सॉफ्ट स्किल्स मध्ये ॲडव्हान्स्ड कम्युनिकेटिव इंग्लिश ॲण्ड प्रोफेशनल स्किल्स ट्रेनर तीन महिने कालावधी, फंडामेंटल्स ऑफ कॉन्टेन्ट रायटिंग तीन महिने, कम्युनिकेटिव इंग्लिश ट्रेनर तीन महिने, पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट ॲण्ड ग्रूमिंग साडे तीन महिने, कस्टमर रिलेशनशिप मॅनेजमेंट हा तीन महिने कालावधीचा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत.

थोडक्यात महत्वाचे

## मध्य रेल्वेची फुकट्यांकडून ८६.७३ कोटींची दंडवसुली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : तिकिटधारक प्रवाशांना सुरक्षित, सुकर व आरामदायक प्रवासाची सुविधा देण्याच्या उद्देशाने मध्य रेल्वेने विनातिकिट प्रवाशांवर कडक कारवाई केली आहे. एप्रिल ते जुलै २०२५ या चार महिन्यांच्या कालावधीत तिकिट तपासणी पथकांनी विनातिकिट, वैध तिकिट नसलेल्या १४.४३ लाख केली. तर, जुलै २०२५ आणि जुलै २०२४ च्या तुलनेत मध्य रेल्वेने अनियमित प्रवासाच्या प्रकरणांमध्ये ६२ टक्के वाढ नोंदवली असून दंड वसुलीत १०० टक्के वाढ झाली आहे. मध्य रेल्वेवरील नियमितपणे मेल-एक्स्प्रेस, पॅसेंजर, विशेष रेल्वेगाड्यामध्ये, मुंबई व पुणे विभागातील लोकलमधील सर्व विभागांमध्ये व्यापक तिकिट तपासणी मोहीमा राबविण्यात आल्या. जेणेकरून विनातिकिट प्रवासावर नियंत्रण ठेवले जाते. अनधिकृत प्रवासावर नियंत्रण ठेवण्यासाठी, मुख्यालय तसेच सर्व विभागांमध्ये नियमितपणे विविध प्रकारच्या तपासण्या केल्या जातात. त्यात स्थानक तपासणी, अचानक धाड तपासणी (अ ॅम्बुश तपासणी), किल्लाबंदी तपासणी (फोर्ट्रेस चेक), व्यापक तपासणी आणि मेगा तिकिट तपासणी मोहिमा यांचा समावेश आहे.

## भिवंडी मेट्रोकामामुळे जखमी व्यतीची प्रकृती अद्यापही चिंताजनक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी येथे मेट्रो मार्गिकच्या निर्माण कामादरम्यान ठेकेदार आणि कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे रिक्षात लोखंडी सळई शिरुन गंभीर जखमी झालेला प्रवाशाची प्रकृती अद्यापही चिंताजनक असल्याची बाब समोर आली आहे. या प्रकरणी भोईवाडा पोलीस ठाण्यात ठेकेदार आणि कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून याघटनेचा सखोल तपास सुरु असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली. घोडबंदर येथील तत्वज्ञान विद्यापीठ परिसरात मेट्रो मार्गिकच्या कामा दरम्यान ३० जुलैला मोटारीवर रॉड पडला होता. या घटनेत वाहन चालक थोडक्यात बचावला. याच भागात २ मे या दिवशी देखील असाच प्रकार उघड झाला होता. एका मोटारीवर क्रेनचा भाग कोसळला होता. त्यापाठोपाठ आता, भिवंडीत देखील असाच प्रकार उघडकीस आला आहे.

## रक्षाबंधांसाठी ठाणे विभागाच्यावतीने अतिरिक्त बस सेवा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : दरवर्षी प्रमाणे यंदाही रक्षाबंधनानिमित्त एसटीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे ठाणे विभागाच्यावतीने अतिरिक्त बस गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये नियमित गाड्यांसह विशेष मार्गांवर ९१ जादा बस गाड्या सोडण्यात येणार आहेत. श्रावणातील भाऊ बहिणीच्या नात्याचे वीण घट्ट करणारा सण अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यानिमित्त सर्वत्र उत्साहाचे वातावरण आहे. यंदा नारळी पौर्णिमा आणि रक्षाबंधन हे सण शुक्रवार, शनिवार असे सुट्ट्यांच्या दिवशी आले आहेत. तसेच, रविवारची सुट्टी देखील आल्याने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ सज्ज झाले आहे. मंडळाच्यावतीने शुक्रवार ते रविवार या कालावधीसाठी जादा गाड्यांचे नियोजन करण्यात आले आहे. यात लांब पल्ल्याच्या आणि मध्यम मार्गांवर जादा गाड्यांचे नियोजन ठाणे विभागाने आखले आहे. तसेच, २० हजार नियमित किलो मीटर पेक्षा जादा किलो मीटरचे नियोजन आखल्याची माहिती महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या ठाणे विभागाने दिली.

## बॅकडेटेड शिक्षक भरती घोटाळ्याची चौकशी होणार ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई:** राज्यातील शालार्थ प्रणालीतील नियमबाह्य आणि बॅक डेटेड शिक्षक भरती घोटाळ्याची पोलखोल वृत्तपत्रांतून झाली होती. अखेर राज्य सरकारने याची गंभीर दखल घेत, या कोट्यवधी रुपयांच्या वेतन घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी विशेष चौकशी पथक नेमण्याचा निर्णय घेतला आहे. शालेय शिक्षण विभागाने ७ ऑगस्ट रोजी जारी केलेल्या शासन निर्णयात म्हटले आहे की, राज्यभरात अपात्र शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नावे शालार्थ प्रणालीत बेकायदेशीररित्या समाविष्ट करून त्यांना वेतन अदा केल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. नागपूर, नाशिक, जळगाव, बीड, लातूर आणि मुंबईसारख्या जिल्ह्यांमधून यासंदर्भात सरकारकडे तक्रारी आल्याचे मान्य करण्यात आले आहे. यासंदर्भात नेमण्यात आलेल्या विशेष चौकशी पथकात पुढील अधिकाऱ्यांचा समावेश आहे: चंद्रकांत पुलकुंडवार, विभागीय आयुक्त, पुणे हे SIT पथकप्रमुख असतील. मनोज शर्मा, पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) हे सदस्य असतील तर हेमंत आठल्ये, सहसंचालक (प्रशासन व नियोजन), शिक्षण आयुक्तालय, पुणे हे चौकशी समितीचे सदस्य सचिव असतील.

## कल्याण तालुक्यात शास्त्रज्ञांचा खरीप पिक पाहणी दौरा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत भात,नाचणी पिकाचे शेतकरी प्रशिक्षण व पीक पाहणी कार्यक्रमाचे आयोजन भिसोळ ता. कल्याण या ठिकाणी करण्यात आले होते.सदर प्रशिक्षणात डॉ.नामदेव म्हसकर सर विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ ,प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र,कर्जत यांनी नाचणी पिक,शाश्वत शेती,सेंद्रिय शेती,शेतीपूरक व्यवसाय,नाचणीचे आहारातील



महत्वया बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. भात व नाचणी,पिकातील आंतर मशागत, खत पाणी व्यवस्थापन,पिकावरील किड व रोग व्यवस्थापन करणे,भात पीक स्पर्धा,कृषि निविष्ठा वापर, या विषयी , तसेच क्षेत्रीय भेटीत नाचणी पिक पाहून किड,रोग यावर मार्गदर्शन श्री. रवींद्र घुडे मंडळ कृषि अधिकारी यांनी सविस्तर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय पाटील उप कृषी अधिकारी यांनी केले तसेच पीएमएफएमई, गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनाविषयी मार्गदर्शन केले.कृषि सखी सौ. संध्या कारले यांनी आभार मानले आणि कार्यक्रमाचे नियोजन ही श्री. संतोष वनकळस सहाय्यक कृषी अधिकारी केले.कार्यक्रमासाठी श्री. रामदास लोणे, सागर कथोरे,श्री. शिवाजी कारले सह बहु संख्येने शेतकरी महिला उपस्थित होते

## पूजा जाधव यांचे कल्याण तहसीलदार कार्यालयासमोर उपोषण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण तालुक्यातील ग्रामपंचायत गोवेली येथील सरपंच पद २५ मे २०२५ पासून रिक्त आहे. सदर बाब ठाणे जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर तात्काळ त्यांनी कल्याण तहसीलदार यांना सदर रिक्त पद भरणे बाबत आदेश दिले आहेत सदर सरपंच पदाचे आरक्षण हे एस.सी. म्हणजे अनुसूचित जातीसाठी आरक्षित आहे. असे असतानाही त्याबाबत अजूनही कार्यवाही झाली नाही 30 दिवसाच्या आत सदर पद भरणे अनिवार्य आहे. याबाबत तहसीलदार कल्याण यांनी तात्काळ सरपंच पदाची निवडणूक घ्यावी यासाठी पूजाताई दीपक जाधव यांनी कल्याण तहसीलदार कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

## मुंबई विद्यापीठाच्या युवक महोत्सवात चमकले जीवनदीपचे तारे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई विद्यापीठाचा ५८ वा युवक महोत्सव हा जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे संपन्न झाला .या युवक महोत्सवाचे यजमानपद हे जीवनदीप महाविद्यालय गोवेली यांच्याकडेच होते ;महाविद्यालयाने सदर महोत्सव उत्तम रीतीने पार पाडण्यासाठी अतिशय उत्तम रित्या नियोजन केले होते.याच जीवनदीप महाविद्यालयातील व त्याच्या इतर शाखांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन घवघवीत यश संपादन केलं. मुंबई विद्यापीठाच्या ठाणे पालघर ग्रामीण झोन क्रमांक ६ च्या या झोनल फेरीमध्ये जीवनदीप महाविद्यालयाने संपादित केलेले यश पुढील प्रमाणे

जीवनदीप महाविद्यालय गोवेली

- नाट्यसंगीत vocal solo: प्रथम क्रमांक (नेहा केणे),
- स्किट: प्रथम क्रमांक (विनय गायकर, हर्षदा शेलार,भूषण मिरकुटे, सानिका भोईर, स्नेहा शेलार, दिपाली तरे)
- मोनो ॲक्टिंग: प्रथम क्रमांक (चेतन साबळे)
- Indian light vocal solo: द्वितीय क्रमांक (नेहा केणे),
- ग्रुप सॉंग: द्वितीय क्रमांक (नेहा केणे, तन्वी केणे, अंकिता विशे, केतकी खोळंबे, हर्षद केमारे)



- मेहंदी डिझाईन : द्वितीय क्रमांक (प्रणाली शेलार)

जीवनदीप महाविद्यालय म्हसा

- वकृत्व स्पर्धा ग्रुप A (मराठी): द्वितीय क्रमांक (रोहिणी गणपत चौधरी)
- वकृत्व स्पर्धा ग्रुप B(हिंदी इंग्रजी):द्वितीय क्रमांक (रोहिणी चौधरी)
- मेहंदी: तृतीय क्रमांक (ज्योत्स्ना भीमा कडव)

जीवनदीप महाविद्यालय खर्डी

- वकृत्व स्पर्धा (इंग्रजी): प्रथम क्रमांक (सार्थक निचिते)
- वकृत्व स्पर्धा (मराठी ):प्रथम क्रमांक (वैष्णवी भगत)
- वादविवाद: प्रथम क्रमांक (कोमल सारूक्ते, वैष्णवी भगत )
- स्किट:द्वितीय क्रमांक (हार्दिक पाटील, अर्जुन जाधव , दीक्षा भगत , सारिका जाधव, तुषार भानुशाली , श्वेता ससाने , सागर गायकोने)
- एकपात्री: द्वितीय क्रमांक (प्रचिती जाधव)

अशा रीतीने जीवनदीपच्या तिन्ही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष. रवींद्र घोडविंदे, संचालक .प्रशांत घोडविंदे, प्राचार्य डॉ. अशोक वाघ, प्रभारी प्राचार्य. कैलास कलकटे, प्रभारी प्राचार्य. योगेश माळी, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे, विद्यार्थी समन्वयक. प्रा.सतीश लकडे, विद्यार्थी समन्वयक. प्रा. विजय सोनार, विद्यार्थी समन्वयक. प्रा. दीप्ती मोरे, मोहन गारे, मयुरी कांबळे, ललिता पवार, इतर प्राध्यापक वर्ग, NSS स्वयंसेवक, शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांच्या सहकार्याने जीवनदीप ने हे घवघवीत यश संपादन केले आहे.












## अल्पवयीन मुलांचा पालकांसह रेल्वे मार्गातून धोकादायक प्रवास

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : कोपर रेल्वे स्थानकातून प्रवाशांनी जिन्यांनी प्रवास करावा म्हणून रेल्वे प्रशासनाने आवश्यक सुविधा, जिने, स्कायवॉक उपलब्ध करून दिले आहेत. तरीही अनेक पालक आपल्या लहान मुलांना घेऊन कोपर पूर्व, पश्चिम भागातून शाळेत, घरी जाण्यासाठी रेल्वे मार्गाचा वापर करत आहेत. कोपर रेल्वे स्थानकात तैनात असलेल्या सुरक्षा बळाच्या जवानांनी, सुरक्षा कमांडोजनी अशा पालकांना रोखून त्यांना योग्य ती समज देण्याची मागणी प्रवासी करत आहेत. अनेक पालक कोपर रेल्वे स्थानकात लोकल येत नाही हे पाहून आपल्या लहान बाळे, नातवांसह रेल्वे मार्गात उतरतात. आणि तेथून रेल्वे मार्गातून फलाटाच्या दिशेने पायी चालत जातात. प्रवाशांनी फलाटावरून थेट रेल्वे मार्गात उतरून प्रवास करू नये म्हणून कोपर रेल्वे स्थानकात फलाटांच्या कोपऱ्यांवर लोखंडी जाळ्या रेल्वेने लावल्या आहेत. तरीही त्या लोखंडी जाळ्यांच्या आडोशाने मोकळ्या जागेतून प्रवासी थेट रेल्वे स्थानकात जातात. अनेक लहान मुले रेल्वे मार्गातून जाण्याची सवय झाल्याने या जाळ्यांच्या भागातून फलाटावर सराईतपणे चढतात.



# गीतासार

## अध्याय १८
## मोक्षसंन्यासयोग:

यया तु धर्मकामार्थान्धृत्या धारयतेऽर्जुन । प्रसङ्गेन फलाकाङ्क्षी धृतिः सा पार्थ राजसी ॥ १८-३४ ॥

परंतु हे पार्था (अर्थात पृथापुत्रा) अर्जुना, फळाची इच्छा असलेला मनुष्य अती आसक्तीमुळे ज्या धारणशक्तीने धर्म, अर्थ व काम यांना धारण करतो, ती धारणा राजसी होय. ॥ १८-३४ ॥

यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदमेव च । न विमुञ्चति दुर्मेधा धृतिः सा पार्थ तामसी ॥ १८-३५ ॥

हे पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), दुष्ट बुद्धीचा मनुष्य ज्या धारणशक्तीमुळे झोप, भीती, काळजी, दुःख आणि उन्मत्तपणाही सोडत नाही, अर्थात धारण करून राहातो, ती धारणा तामसी होय. ॥ १८-३५ ॥

सुखं त्विदानीं त्रिविधं शृणु मे भरतर्षभ । अभ्यासाद्रमते यत्र दुःखान्तं च निगच्छति ॥ १८-३६ ॥ यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम् । तत्सुखं सात्त्विकं प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजम् ॥ १८-३७ ॥

हे भरतर्षभा (अर्थात भरतवंशीयांमध्ये श्रेष्ठ अर्जुना), आता तीन प्रकारचे सुखही तू माझ्याकडून ऐक. ज्या सुखात साधक भजन, ध्यान आणि सेवा इत्यादींच्या अभ्यासाने रमतो आणि ज्यामुळे त्याचे दुःख नाहीसे होते, जे आरंभी जरी विषाप्रमाणे वाटले, तरी परिणामी अमृताप्रमाणे असते, ते परमात्मविषयक बुद्धीच्या प्रसादाने उत्पन्न होणारे सुख सात्त्विक म्हटले गेले आहे. ॥ १८-३६, १८-३७ ॥

विषयेन्द्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् । परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम् ॥ १८-३८ ॥

जे सुख विषय आणि इंद्रिये यांच्या संयोगाने उत्पन्न होते, ते प्रथम भोगताना अमृतासारखे वाटत असले तरी परिणामी विषासारखे असते. म्हणून ते सुख राजस म्हटले गेले आहे. ॥ १८-३८ ॥

## रेसिपी
# बटाट्याचं धिरडं



साहित्य-

बटाटे - तीन मध्यम आकाराचे किसलेले
कांदा - एक बारीक चिरलेला
हिरवी मिरची - दोन बारीक चिरलेला
कोथिंबीर - दोन टेबलस्पून
बेसन - तीन टेबलस्पून
मीठ चवीनुसार
तिखट - अर्धा टीस्पून
गरम मसाला - १/४ टीस्पून
तेल

कृती-

सर्वात आधी एका मोठ्या भांड्यात बटाट्याचा किस, चिरलेले कांदे, हिरवी मिरची, कोथिंबीर, बेसन, मीठ, तिखट आणि गरम मसाला घाला आणि चांगले मिसळा. जर मिश्रण खूप कोरडे वाटत असेल तर तुम्ही थोडे पाणी घालू शकता, परंतु लक्षात ठेवा की पीठ घट्ट राहील.आता एक नॉन-स्टिक पॅन गरम करा आणि त्यावर थोडे तेल घाला. मिश्रणाचा एक छोटासा भाग घ्या आणि ते तव्यावर पसरवा आणि थोडेसे सपाट करा. आता मंद आचेवर दोन्ही बाजूंनी सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत शिजवा. तयार बटाट्याचे धिरडे एका प्लेटमध्ये काढा व हिरवी चटणी किंवा टोमॅटो सॉससोबत गरमागरम सर्व्ह करा.

# वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पोलीस उपायुक्त रस्त्यावर..

## भिवंडीतील बागे फिर्दोस येथे एकेरी वाहतूक



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : गेल्या काही महिन्यापासून भिवंडी शहरातील विविध प्रमुख मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याने नागरिकासह वाहन चालक त्रस्त झाले आहेत.याबाबत नागरिकांनी वाहतूक पोलीस विभागाकडे तक्रारी केल्या आहेत. त्यामुळे त्यावर उपाययोजना करण्याच्या हेतूने ठाणे शहर वाहतूक विभागाचे पोलीस उपाआयुक्त पंकज शिरसाठ यांनी स्वतः रस्त्यावर उतरून वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी उपाययोजना केली आहे.त्यामुळे काही प्रमाणात लोकांना वाहतूक कोंडी पासून दिलासा मिळाला आहे.

भिवंडी शहरातील वंजारपाटी नाका जवळ असलेल्या बागे फिर्दोस येथील रस्त्यावर दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते त्यामुळे पोलीस उपाआयुक्त शिरसाठ स्वतः रस्त्यावर उभे राहून त्यांनी होणारी वाहनांची क्रॉसिंग बंद केली असून या मार्गावर सरळ एकेरी वाहतूक सुरु केली आहे.

भिवंडी-वाडा या मार्गावरून मुंबईकडे जाणारी छोटी आणि जड वाहने वडपे मार्गे नाशिक-मुंबई या महामार्गाने न जाता हि वाहने भिवंडी शहरात येतात. त्यामुळे शहरात वाहतुकीचा ताण वाढला आहे. शहरात उद्योग व्यवसायाच्या निमित्ताने वाहनांची संख्या जास्त आहे. त्यातच ह्या वाहनांची भर झाल्याने नदीनाका ते अंजूरफाटा या दरम्यान वाहनांची मोठी गर्दी होते. त्यातच बागे फिर्दोस या ठिकाणी नेहमी दुचाकी आणि मोटारींची क्रॉसिंग होत असल्याने वाडा मार्गे येणारी वाहने व नाशिककडे जाणाऱ्या वाहनांची वंजारपाटी चौकात आणि तेथील उड्डाणपुलावर वाहतूक कोंडी होऊन संपूर्ण वाहतूक व्यवस्था कोलमडत होती तसेच या वाहतूक कोंडीचे परिणाम कल्याण नाक्यापर्यंत असलेल्या एस.टी. स्थानक,सरकारी कार्यालये, भिवंडी कोर्ट, इंदिरागांधी रुग्णालय या सर्व व्यवस्थेवर होत होते. त्यामुळे या वाहतुकीमध्ये

> भिवंडी शहरात अवजड वाहनांना बंदी केली असताना सुद्धा अनेक वेळा बेकायदेशीरपणे शहरात येत आहेत त्यामुळे महापालिका प्रशासन व वाहतूक पोलिसांनी समन्वय करून अवजड वाहनांना बंदी करावी.
> - अँड.सुनील पाटील,भिवंडी.

> भिवंडी शहरातील अंतर्गत व मुख्य रस्त्यांवर वाहतुकीची बेकायदेशीर पार्किंग केली जाते.शहरातील रस्त्यांवर खड्डे पडल्यामुळे सुद्धा वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने वाहतूक पोलीसां सोबत पाहणी करून वाहतूक कोंडी वर उपाययोजना करणे आवश्यक आहे.- डॉ. प्रसन्न सोमन,भिवंडी.

सुरळीतपणा आणणे अपेक्षित होते. त्याची दाखल घेत ठाणे वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाठ यांनी यांनी वाहतूक नियंत्रण अधिसूचना जाहीर केली. त्यानुसार स्व.राजीवगांधी उड्डाण पुलावरून आणि पुलाखाली एस.टी.स्थानककडून खंडुपाड्याकडे जाणाऱ्या सर्वप्रकारच्या वाहनांना बागे फिर्दोस चौक येथे प्रवेश बंद करण्यात आला असून या सर्व वाहनांनी वंजारपटीनाका येथे युटर्न घेऊन बागेफिर्दोस चौकातून पुढे जाणार आहेत. तसेच खंडुपाडा येथून उजवीकडे वंजारपट्टीनाका आणि उड्डाणपुलाकडे जाण्यास बंदी केली असून हि सर्व वाहने एस.टी.स्थानक चौकातून युटर्न घेऊन वंजारपटीनाका येथे जातील अशी अधिसूचना जाहीर केली आहे. या अधिसूचनेचे वाहनचालकांकडून पालन व्हावे,यासाठी बागे फिर्दोस्त येथे तात्पुरता लोखंडी स्टँडची (बँरीकेट) भिंत उभारली आहे. त्यामुळे वाहतुकीमध्ये सुरळीतपणा आला असून भविष्यात या ठिकाणी पालिकेकडून दुभाजक उभारण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके



आज ८ ऑगस्ट, आपल्या इरसाल आणि गावरान भाषेतील विनोदाने महाराष्ट्राला खळखळून हसवणारे विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके यांची जयंती. जवळपास तीन दशकांहून अधिक काळ मराठी चित्रपट सृष्टीवर एकहाती अधिराज्य गाजवून मराठी सिनेमाला सुवर्णकाळ दाखवणाऱ्या विनोद सम्राट दादा कोंडके यांचा जन्म ८ ऑगस्ट १९३२ रोजी मुंबईतील नायगाव येथे झाला. त्यांचा जन्म झाला तो दिवस गोकुळ अष्टमीच्या होता, आपल्या पोटी बाळकृष्ण जन्माला आला म्हणून आई वडिलांनी त्यांचे नाव कृष्णा ठेवले. पण लहानपणापासूनच सर्व जन त्यांना दादा म्हणत पुढे त्यांचे नाव रूढ झाले. त्यांच्या मोठ्या बंधूचे निधन झाल्याने त्यांच्यावर घराची जबाबदारी पडली त्यामुळे दादा दरमहा साठ रुपये पगारावर सेवादलाच्या बँड पथकात काम करू लागले. लहानपणापासून दादांना कलेची आवड होती. सेवादलाच्या बँड पथकात त्यांच्या कला आणखी बहरून आल्या. फावल्या वेळात प्रसिद्ध गाण्यांचे विडंबन करणे, गाण्यांना चाली लावणे, विचित्र गाणी रचणे असे उद्योग दादा करू लागले. निळू फुले, राम नगरकर यासारखे जेष्ठ कलाकारही त्या काळात सेवादलात होते. तिथेच दादांची या महान कलाकारांशी मैत्री झाली आणि ही मैत्री पुढे आयुष्यभर टिकून राहिली. दादा सेवादलाच्या बँड पथकात काम करत असल्याने त्या काळात त्यांना बँड वाले दादा म्हणूनच लोक ओळखत असे. पुढे दादांनी स्वतःचा फड काढला. गावोगावी जाऊन दादा स्वतःची कला सादर करू लागले. वसंत सबनिसांच्या विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने दीडशे प्रयोग पूर्ण केले. त्या काळी हा विक्रम होता. या वगनाट्यामुळे दादा भलतेच लोकप्रिय झाले. गावागावांतील रसिक प्रेक्षक दादांना ओळखू लागले. याच वगनाट्यातील त्यांचे काम पाहून महान दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांनी त्यांना थेट चित्रपटात काम करण्याची संधी दिली. भालजी पेंढारकर यांनी त्यांना त्यांच्या तांबडी माती या चित्रपटात मुख्य भूमिका दिली. दादांनी या भूमिकेचे सोने केले. हा चित्रपट तिकीटबारीवर हिट झाला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. या चित्रपटानंतर दादांनी मागे वळून पाहिले नाही. मराठी चित्रपट सृष्टीत दादा कोंडके हे सर्वत्र नाव घुमू लागले. १९७१ साली दादा कोंडके यांनी दिग्दर्शित केलेला सोंगाड्या हा चित्रपट प्रदर्शित झाला मात्र मुंबईतील चित्रपटगृह चालकांनी आपल्या चित्रपटगृहात सोंगाड्या न लावता तीन देविया हा हिंदी चित्रपट लावला. आपल्या पहिल्याच चित्रपटाला चित्रपटगृह मिळत नसल्याचे पाहून दादा उद्विग्न झाले आणि त्यांनी थेट बाळासाहेब ठाकरेंची भेट घेतली मग काय बाळासाहेबांचा आदेश आणि शिवसैनिकांचा चित्रपटगृहात राडा. शिवसैनिकांनी चित्रपटगृहात घातलेल्या राड्याने आणि बाळासाहेबांच्या आदेशाने सोंगाड्या चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. नुसताच प्रदर्शित झाला नाही तर सुपर डूपर हिट झाला. सोंगाड्या पाहायला प्रेक्षकांच्या रांगा लागल्या. सोंगाड्या हा त्या काळातील सर्वाधिक हिट मराठी चित्रपट ठरला. सोंगाड्यामुळे मरगळलेल्या मराठी चित्रपट सृष्टीला ऊर्जितावस्था मिळाली. तमाशापटाला कंटाळलेल्या मराठी चित्रपट रसिकांना सोंगाड्यात दादांनी आपल्या विनोदाने मनमुराद हसवले. दादांच्या विनोदाला मराठी रसिकांनी मनमुराद दाद दिली. सोंगाड्याच्या अभूतपूर्व यशानंतर दादा कोंडके यांनी आणखी एका नव्या चित्रपटाची घोषणा केली या चित्रपटाचे नाव होते एकटा जीव सदाशिव. सोंगाड्यामुळे दादांची लोकप्रियता तुफान वाढली होती. या लोकप्रियतेचा धसका हिंदी चित्रपट सृष्टीनेही घेतला होता. दादांनी एकटा जीव सदाशिव या चित्रपटाची घोषणा केल्यावर राज कपूर यांनी त्यांच्या मुलासाठी म्हणजे ऋषी कपूर साठी काढलेला बॉबी या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली. सोंगाड्या पाठोपाठ एकटा जीव सदाशिव हा चित्रपटही सुपर हिट झाला. त्यानंतर दादांनी पांडू हवालदार या चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटात दादांनी अशोक सराफ यांना संधी दिली. हा चित्रपटही यशस्वी ठरला मग काय त्यानंतर दादांच्या यशस्वी चित्रपटांची मालिकाच सुरू झाली. तुमचं आमचं जमल, राम राम गंगाराम, बोट लावील तिथं गुदगुल्या, ह्योच नवरा पाहिजे, आली अंगावर, मुका घ्या मुका, पळवा पळवी, येऊ का घरात, सासरचे धोतर असे दादांचे सलग चित्रपट यशस्वी झाले. सलग नऊ रौप्य महोत्सवी चित्रपट देण्याचा विक्रम दादांनी केला. त्यांच्या या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली. त्यांच्या यशस्वी चित्रपटात त्यांच्या इरसाल विनोदाचा जितका वाटा होता तितकाच त्या चित्रपटातील श्रवणीय गाण्यांचा देखील होता. दादा कोंडके यांच्या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. आजही दादांच्या चित्रपटातील गाणी तितकीच लोकप्रिय आहेत. दादांचे चित्रपट जितके लोकप्रिय झाले तितकेच ते वादग्रस्तही ठरले. त्यांच्या सर्वच चित्रपटांना सेन्सॉर बोर्डने आडकाठी आणली मात्र दादांनी सेन्सॉर बोर्डाच्या या दंडेली पुढे कधीही नमते घेतले नाही उलट सेन्सॉर बोर्डशी त्यांनी कायम दोन हात केले. ज्या शिवसेनेमुळे त्यांचे चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होऊ शकले त्या शिवसेनेशी त्यांनी कधीही प्रतारणा केली नाही. आयुष्यभर त्यांनी शिवसेनेशी बांधिलकी राखली. १४ मार्च १९९८ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. दादांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वावर दुःखाचा डोंगर कोसळला. प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या विनोदाच्या या सम्राटाने अशी अकाली एक्झीट घेतल्याने प्रेक्षकांना मोठा धक्का बसला. त्यांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वाला सुवर्णकाळ दाखवणारा विनोदाचा सम्राट काळाच्या पडद्याआड गेला. मराठी चित्रपट सृष्टीत त्यांच्यासारखा विनोद सम्राट पूर्वी झाला नाही आणि पुढेही होणार नाही. विनोद सम्राट दादा कोंडके यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

- श्याम ठाणेदार ,दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# आदर्श शिक्षक कै. गजानन खारपाटील यांची पुण्यतिथी साजरी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : आदर्श शिक्षक गजानन खारपाटील गुरुजींची पाचवी पुण्यतिथी चिरनेर येथील निवासस्थानी साजरी करण्यात आली.

गजानन खारपाटील गुरुजी यांना रायगड जिल्हा परिषदेने १९८२ साली आदर्श शिक्षक आणि शिवभूमी शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित केले होते. १९८३ साली उमरठ येथे सुभेदार नरवीर तानाजी मालुसरे यांच्या स्मृतिदिनी झालेल्या वकृत्व स्पर्धेत त्यांचा रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक आला होता.अल्पबचत साठी त्यांना रायगड जिल्हा कलेक्टर यांनी सन्मानित केले होते.शालेय जीवनात सातवी मध्ये केंद्रात प्रथम, एस. एस. सी मध्ये उरण तालुक्यात प्रथम, डी एड ला रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक आला होता. त्यांच्या पत्नी सौ शारदा खारपाटील यांना रायगड जिल्हा परिषदेने १९९० साली आदर्श शिक्षिका म्हणून सन्मानित केले होते.

त्यांना अभिवादन करण्यासाठी उद्योगपती पी पी खारपाटील, उद्योगपती राजाशेठ खारपाटील, कर्जत पंचायत समिती चे माजी सभापती तथा रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य , काँग्रेस नेते अरविंद पाटील,सौ.मनिषा नितिन ठाकूर ( जिल्हानिहाय वक्ता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे ) आणि श्री. नितिन लक्ष्मण ठाकूर (सोशल मिडिया समन्वयक उरण विधानसभा ) चिरनेर ग्रामपंचायत चे माजी सरपंच पद्माकर फोफेरकर ,चिरनेर शिवसेनेचे माजी शाखाप्रमुख पद्माकर मोकल,चिरनेर ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच सचिन घबाडी, आदर्श शिक्षक संजय होळकर, , अर्थ व सांख्यकीय संचनालय मुंबई चे सेवानिवृत्त संशोधन अधिकारी काशिनाथ मोकल, उरण इंटक चे अध्यक्ष राजेंद्र भगत नाट्य कलाकार संतोष ठाकूर गायनाचर्य वासुदेव पाटील, चिरनेर हरिपाठचे दत्ता मोकल, गोपाल दुंगीकर, रमेश गोंधळी,भजनसम्राट हरिश्चंद्र बुवा गोंधळी, पत्रकार तृप्ती भोईर, रणीता ठाकूर , अनंत नारंगीकर, आगरी भूषण प्राध्यापक संदेश पाटील,सेवानिवृत मुख्याध्यापक ए डी पाटील,सेवानिवृत शिक्षिका माधवी म्हात्रे, कर्जत पंचायत समिती मधील जनार्दन पानमंद, पुणे येथील सामाजिक कार्यकर्ते दिपक कदम,शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाचे शशांक ठाकूर, सेवानिवृत्त सहाय्यक पोलिस इन्स्पेक्टर अशोक पाटील, रांजणपाडा.. चिंचपाडा ग्रामस्थ कमिटी चे उपाध्यक्ष प्रितेश फुंडेकर,उद्योजक गजेंद्र सिंह राजपुरोहित, सेकंडरी स्कूल चिरनेर दहावी १९८५ ग्रुपचे सुरेश केणी, सुभाष पाटील,निर्मला केणी, जेएनपीटी चे सेवानिवृत्त कामगार नरेंद्र ठाकूर, घनश्याम भोईर,गुरुजींचे नातेवाईक, विद्यार्थी, खारपाटील परिवार, चिरनेर ग्रामस्थ आदी शेकडो जणांनी उपस्थित राहून गुरुजींना आदरांजली वाहिली.

यावेळी माऊली महिला हरिपाठ मंडळ चिंचवली यांचा सुश्राव्य हरिपाठ झाला. सर्वजण भक्तिरसात तल्लीन झाले होते .प्रास्ताविकात मिलिंद खारपाटील यांनी सांगितले की वाचाल तर वाचाल हा गुरुजींचा संदेश होता

गुरुजींच्या स्मृतीप्रित्यर्थ आतापर्यंत पाच लाख रुपयांची पुस्तके अनेक शाळा आणि वाचनालयांना दिली असून भविष्यात आणखी काही पुस्तके देण्याची घोषणा त्यांनी केली. गुरुजींनी अनेक विद्यार्थी घडवले. नाट्य दिग्दर्शन करून रायगड जिल्ह्यात अनेक नाट्य कलाकार निर्माण केले. त्यांचे अनेक विद्यार्थी स्कॉलर असून उच्चपदस्थ आहेत असे रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अरविंद पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले. पुण्यतिथी चे औचित्य साधून कातळपाडा आणि चिंचपाडा रांजणपाडा येथे चित्रकलेच्या वह्या आणि रंगीत खडू ,खाऊ यांचे वाटप करण्यात आले.

# आठशेहून अधिक कंत्राटी शिक्षक पाच महिन्यांपासून मानधनाच्या प्रतीक्षेत

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा : पेसा क्षेत्रांतर्गत नियुक्त केलेल्या 822 शिक्षकांचे मानधन गेल्या पाच महिन्यांपासून रखडले आहे, त्यामुळे या शिक्षकांचे आर्थिक नियोजन बिघडले आहे असून त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या शिक्षकांना दरमहा 16 ते 20 हजार रुपये मानधन देण्यात येते. मार्चपासून त्यांना मानधन मिळालेले नाही. नियुक्त केलेले शिक्षक अतिदुर्गम भागात देखील उत्तम कर्तव्य बजावत आहेत, उसनवारी करून शाळेत पोहोचायचे आणि मुलांना शिकवायचे अशी परिस्थिती या शिक्षकांवर आली आहे. उसनवारी, कर्ज, उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाल्याने मानधन न मिळाल्यास जिल्ह्यातील सर्व कंत्राटी शिक्षक काम बंद आंदोलन करतील असा इशारा शिक्षकांनी दिला आहे.

> कायमस्वरूपी शिक्षकांच्या पगारासोबत कंत्राटी शिक्षकांच्या मानधनाची मागणी शासनाकडे केली जाते मात्र सदर शिक्षकांचे मानधन शासन स्तरावरून प्रलंबित आहे, कधीपर्यंत होईल हे सांगता येणार नाही.
> - सोनाली मातेकर शिक्षणाधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद पालघर

दुर्गम भागात सेवा देत असल्याने आम्हाला अगोदरच अनेक समस्यांना सामोरे जावे लागते तरी सर्व अडचणी लक्षात घेऊन शासनाने आमचे मानधन लवकर अदा करावे (राजेश्री पाटील, कंत्राटी शिक्षक)

# अमली पदार्थ विरोधात कारवाया वाढविण्यात याव्यात

## - गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम यांचे निर्देश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्यात अमली पदार्थांची विक्री, वाहतूक आणि खरेदीवर नियंत्रण आणण्यासाठी कारवाया वाढविण्यात याव्यात, अमली पदार्थ विरोधी कृती दलांच्या क्षेत्रीय कार्यालयासाठी जागा शोधणे, त्याठिकाणी कार्यालये सुरू करणे, पदभरती करणे आदी बाबींची पूर्तता करण्यासाठी नियोजन पूर्वक कालबद्ध कार्यक्रम राबवावा, अशा सूचना गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिल्या.

मंत्रालय येथे आयोजित बैठकीत राज्यमंत्री श्री.कदम बोलत होते. या बैठकीला गृह विभागाचे प्रधान सचिव अनुपकुमार सिंग, अमली पदार्थ विरोधी कृती दलाच्या पोलिस महानिरीक्षक शारदा राऊत, उपसचिव राहुल कुळकर्णी, पोलिस उपायुक्त नवनाथ ढवळे आदी उपस्थित होते.

शासनाने अमली पदार्थ विरोधी कृती दलाची (अँटी नार्कोटिक्स टास्क फोर्स) स्थापना केली आहे. या कृती दलामध्ये तातडीने पदभरती करण्याची कार्यवाही पूर्ण करून ही दले अधिक सक्षमतेने कार्यान्वित करावी, असे निर्देशही राज्यमंत्री श्री. कदम यांनी दिले. राज्यमंत्री श्री. कदम म्हणाले, अमली पदार्थ विक्री, खरेदी, वाहतूक आणि प्रतिबंध करण्यासाठी कारवाया करण्यात येतात. याप्रकरणी न्यायालयात दाखल खटले तातडीने निकाली काढण्यासाठी कार्यवाही करावी. प्रलंबित खटल्यांची तपशिलवार माहिती नियमित स्तरावर सादर करावी. अमली पदार्थ विरोधी कृती दलांची क्षेत्रीय कार्यालये सुरू करावीत. या दलामध्ये अधिकारी व कर्मचारी रुजू होण्यासाठी विशेष भत्ता, पुढील पदाचे वेतन देण्याबाबत प्रस्ताव सादर करावा.

अमली पदार्थ बऱ्यापैकी सागरी मार्गाने येतात. त्यामुळे सागरी किनारी भागातील अंमली पदार्थ विरोधी दलाला काही विशेष उपकरणे, वाहने देण्यात यावीत. किनारी भागात होणाऱ्या अमली पदार्थ खरेदी, विक्रीवर लक्ष ठेवून कारवाया वाढविण्यात याव्यात, अशा सूचनाही राज्यमंत्री श्री कदम यांनी दिल्या.

# एक राखी सैनिकांसाठी NSS च्या स्वयंसेवकांचा उपक्रम



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

गोवेली : भारतीय सीमेवर स्वतःच्या जीवाची पर्वा न करता भारत देशाचे संरक्षण करणारे. भारताचे वीर सैनिक यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करावी या हेतूने; जीवनदीप महाविद्यालय गोवेली च्या NSS स्वयंसेवकांनी आपल्या हाताने राखी बनवून त्या काश्मीर सीमेवर लढणाऱ्या जवानांना पाठवण्यासाठी एक राखी सैनिकांसाठी हा उपक्रम राबवला. या उपक्रमात ५० हून अधिक स्वयंसेवकांनी सहभाग घेतला; व तब्बल १०० हून अधिक राख्या जवानांना या उपक्रमांतर्गत पाठवण्यात आल्या. दिनांक ०५- ०८- २०२५ रोजी हा उपक्रम राबवण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष. रवींद्र घोडविंदे, सचिव. सौ. स्मिता घोडविंदे, मा. प्रशांत घोडविंदे, डायरेक्टर. डॉ. के. बी. कोरे, प्राचार्य. डॉ.अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे, NSS कार्यक्रमाधिकारी. दिनेश धनगर, प्रा. धनश्री नाईक , प्राध्यापक वर्ग NSS स्वयंसेवक यांच्या सर्वांच्या सहकार्य हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला.

# आजचे राशि भविष्य



**मेष**
कुटुंबात विशेष लोकांचे आगमन होऊ शकते, तुम्ही त्याच्या तयारीत व्यस्त असाल. तुमच्या वैवाहिक जीवनात खूप आनंद असेल.

**वृषभ**
काही कामे वेळेपूर्वी पूर्ण केल्याने तुम्हाला आनंद मिळेल.इलेक्ट्रॉनिक्स व्यापाऱ्यांना लाभाची शक्यता आहे. वैवाहिक जीवनात जवळीक वाढेल.

**मिथुन**
नियोजित काम पूर्ण करण्यात यश मिळेल. स्थावर मालमत्तेशी संबंधित काम पुढे सरकेल. कुटुंबातील संपत्तीशी संबंधित कोणताही वाद सोडवला जाईल.

**कर्क**
व्यवसायात सुखद बदल होतील.जीवनात पैशाशी संबंधित काही समस्यांमुळे त्रस्त होऊ शकता. जीवनसाथीसोबत काही मुद्द्यावरून वाद होऊ शकतो.

**सिंह**
या राशीच्या सरकारी विभागातील कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ होऊ शकते आणि लवकरच काही चांगली बातमी मिळेल.

**कन्या**
संध्याकाळी आपण बाहेर जेवू. मुलांशी परस्पर स्नेह वाढेल. शिक्षकांच्या बदलीच्या अडचणी संपतील, हव्या त्या ठिकाणी बदल्या होतील.

**तूळ**
वरिष्ठांची मदत मिळेल. खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये निष्काळजीपणा आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतो. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**वृश्चिक**
एखादी छोटीशी बाबही भांडणाचे रूप धारण करू शकते, ज्यामुळे तुम्ही अडचणीत येऊ शकता. जोडीदारासाठी काही खास करू शकता.

**धनु**
तुमच्या मेहनतीने व्यवसायात प्रगती कराल. तुम्हाला चांगली बातमी मिळेल.तुमची नियोजित कामे वेळेवर पूर्ण होताना दिसत आहेत.

**मकर**
आर्थिक स्थिती मजबूत होईल. आज व्यवसायात यशाच्या अनेक संधी मिळतील. मित्र तुमचे मनोबल वाढवतील. आरोग्य सुधारत राहील.

**कुंभ**
कायदेशीर कामासाठी धावपळ केल्यामुळे थकवा जाणवेल. आज आपल्याला वैवाहिक जीवनात एकमेकांना समजून घ्यावे लागेल.

**मीन**
तुम्ही नवीन व्यवसाय सुरू केला असेल तर त्यात चांगला नफा मिळेल.मन एखाद्या गोष्टीबद्दल खूप आनंदी असेल. सुखद क्षण अनुभवाल.







## पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांसाठी नेत्र तपासणी व चष्मा वाटप शिबीर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : पोलीस आयुक्त, ठाणे शहर, ठाणे जिल्हा माहिती कार्यालय, वेसाक इंडिया, के.जे. सोमय्या महाविद्यालय, अलायन्स क्लब ऑफ पुणे, एच.व्ही.देसाई हॉस्पिटल, पुणे व के.जे. सोमय्या महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि.10 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 10 वाजता पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे पोलीस दवाखाना, ठाणे शहर येथे मोफत नेत्र तपासणी व मोफत चष्मा वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच या शिबीरात मोफत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया देखील होणार आहे.

तरी, ठाणे शहरातील सर्व इच्छुक पोलीस अधिकारी-कर्मचारी, ठाणे पोलीस शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थीनी व त्यांचे पालक, प्रसारमाध्यम प्रतिनिधी यांनी दि.10 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 10 वाजता पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे पोलीस दवाखाना, ठाणे शहर येथे या मोफत नेत्र तपासणी शिबीरामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांमार्फत करण्यात आले आहे.


## उल्हासनगर महानगरपालिका,उल्हासनगर

### शहर अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कार्यालय

**ई- निविदा क्र. २१४,२१५,२१६,२१७ (२०२५-२६)**

उल्हासनगर महानगरपालिका शहरा मधील खालील नमुद कामे योग्यवर्गातील ठेकेदारा कडून निविदा प्रणाली पध्दतीनुसार महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन राहून दिनांक ०८/०८/२०२५ रोजी निविदा मागविण्याकरीता प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सदर निविदा प्रणालीबाबत इतर आवश्यक माहिती https://mahatenders.gov.in/ या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**ई- निविदा क्र. २१४ (२०२५-२६)**

| अ.क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम (जी.एस.टी वगळून) | इसारा रक्कम | कालावधी | वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मपा/साबांवि/ नोटीस/२०२५-२६/०६ | वर्ष २०२५-२६ मध्ये पावसाळयापुर्वी उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्रं. १ मधील रस्त्यांवरील खड्डे डांबरिकरणाने भरणेबाबत. | ४२३७२८८/- | ४३०००/- | ९० दिवस | NA |

**ई- निविदा क्र. २१५ (२०२५-२६)**

| अ.क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम (जी.एस.टी वगळून) | इसारा रक्कम | कालावधी | वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मपा/साबांवि/ नोटीस/२०२५-२६/०७ | वर्ष २०२५-२६ मध्ये पावसाळयापुर्वी उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्रं.२ मधील रस्त्यांवरील खड्डे डांबरिकरणाने भरणेबाबत. | ५९३२२०३/- | ५९४००/- | ९० दिवस | NA |

**ई- निविदा क्र. २१६ (२०२५-२६)**

| अ.क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम (जी.एस.टी वगळून) | इसारा रक्कम | कालावधी | वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मपा/साबांवि/ नोटीस/२०२५-२६/०७ | वर्ष २०२५-२६ मध्ये पावसाळयापुर्वी उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्रं. ३ मधील रस्त्यांवरील खड्डे डांबरिकरणाने भरणेबाबत. | ४२३७२८८/- | ४३०००/- | ९० दिवस | NA |

**ई- निविदा क्र. २१७ (२०२५-२६)**

| अ.क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम (जी.एस.टी वगळून) | इसारा रक्कम | कालावधी | वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मपा/साबांवि/ नोटीस/२०२५-२६/०७ | वर्ष २०२५-२६ मध्ये पावसाळयापुर्वी उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्रं. ४ मधील रस्त्यांवरील खड्डे डांबरिकरणाने भरणेबाबत. | ५५०८४७४/- | ५६०००/- | ९० दिवस | NA |

सदर निविदा प्रणालीबाबत इतर आवश्यक माहिती https://mahatenders.gov.in/ या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

जा. क्र. उमपा/पीआरओ/२४२/२०२५
दिनाक : ०७/०८/२०२५

सही /-
कार्यकारी अभियंता (साबांवि)
उल्हासनगर महानगरपालिका



## सामाजिक वनीकरण, ठाणे

### विभागीय वन अधिकारी

**विभागीय वन अधिकारी यांचे कार्यालय सामाजिक वनीकरण, ठाणे**

**ई-निविदा सुचना**

**क्रं. एसएफडी/ठाणे/आरटी-०१ सन २०२५-२६**

विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण, ठाणे यांचेमार्फत E- Tendering द्वारे वाहनचालक (Driver) व रखवालदार (Watchman) या सेवांसाठी कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ पुरवण्यासाठी नोंदणीकृत पुरवठादार यांचेकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे.

1. सदरची निविदा प्रक्रिया ही ऑनलाईन पद्धतीने होणार आहे.
2. शासनाच्या प्रचलित अटी व शर्ती लागु राहतील.
3. विस्तृत माहिती महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा पोर्टलमधील www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
4. सदरची ई- निविदा कार्यप्रणालीव्दारे दिनांक 11/08/2025 रोजी सकाळी 11.00 वाजेपासून दिनांक 18/08/2025 रोजी दुपारी 05.00 वाजेपर्यंत भरता येईल.
5. या पुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध करणेत येईल.
6. कोणतीही निविदा स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण, ठाणे यांना राहील.

सही/-
(नम्रता पवार)
विभागीय वन अधिकारी
सामाजिक वनीकरण ठाणे (अ.का)

जा.क्र. जिमाका/ठाणे/जाहि क्र.६१/११०८/२०२५-२६
दि. ०७/०८/२०२५


### भिवंडी मनपा आयुक्त व पोलीस प्रशासनाकडून

# रस्ते ठेकेदारांची झाडाझडती



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी शहरातील रस्त्यांची झालेली खड्डे पडून झालेली दुरावस्था व शहरात सार्वजनिक बांधकाम विभाग एमएमआरडीए प्रशासना कडून सुरू असलेल्या सिमेंट काँक्रिट रस्ते कामात होत असलेल्या दिरंगाईमुळे शहरातील नागरिक त्रस्त आहेत.येणाऱ्या गणेशोत्सव सणा दरम्यान ही परिस्थिती न सुधारल्यास मोठा रोष निर्माण होऊ शकतो.त्या पार्श्वभूमीवर महापालिका सभागृहात झालेल्या बैठकीत आयुक्त अनमोल सागर व पोलिस उपायुक्त शशिकांत बोराटे यांनी सार्वजनिक बांधकाम व एमएमआरडीए अधिकाऱ्यांसह ठेकेदारांची झाडाझडती घेत कारवाई करण्याचा सज्जड दम दिला आहे.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके,सहाय्यक पोलिस आयुक्त सचिन सांगळे,सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता दत्तू गीते,एमएमआरडीएचे अभियंता यांच्यासह प्रभाग पालिका अधिकारी व ठेकेदार उपस्थित होते.

या बैठकीत आयुक्त अनमोल सागर व पोलिस उपायुक्त शशिकांत बोराटे यांनी रस्त्यांचे दुरावस्थे बाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. येत्या १५ दिवसात सर्व रस्त्यांची कामे पूर्ण करावीत असे ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांना आयुक्त अनमोल सागर यांनी सांगितले, जेणे करून गणेश आगमन व विसर्जन निर्विघ्न पार पडेल असा विश्वास व्यक्त केला.तर पोलिस उपायुक्त शशिकांत बोराटे यांनी रस्त्यांचे दुरावस्थे मुळे अपघात झाल्यास व त्यामध्ये जीवितहानी झाल्यास ठेकेदार व संबंधित अधिकारी यांची गय न करता गुन्हे दाखल करण्यात येतील असा सज्जड दम ठेकदार व संबंधित अधिकाऱ्यांना दिला.

## आ. सुलभा गायकवाड यांच्या हस्ते नव्या जलवाहिनीचे लोकार्पण



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : वॉर्ड क्र. ११८ मधील कृष्णा नगर, खानचाळ, आशेळे गाव (कल्याण पूर्व) या परिसरातील नागरिकांच्या दीर्घकालीन मागणीचा सकारात्मक विचार करून, नवीन पाण्याची पाइपलाईन टाकण्याचे काम हाती घेण्यात आले होते.आज या महत्त्वपूर्ण योजनेचा लोकार्पण व शुभारंभ आ. सुलभा गायकवाड यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

या लोकार्पण सोहळयावेळी नितीन तरे, हनुमान कडू, जितेंद्र ठाकूर, जयशंकर कोळेकर, नरेश पाखरे, शहा आलम खान, सुनंदा आमोदकर, रिया यादव, राजू दिचमलवाड, सविता दिचमलवाड तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> **या नव्या पाइपलाईन मुळे आता परिसरातील पाणीटंचाई कमी होऊन नागरिकांना स्वच्छ आणि नियमित पाणीपुरवठा होईल, याची मला खात्री आहे.**
> **- आ. सुलभा गायकवाड**

# भिवंडी-दिवा शटल सेवा वाढवावी

### खा.बाळ्या मामा म्हात्रे यांचे रेल्वेमंत्र्यांना निवेदन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी लोकसभा क्षेत्रातील प्रवाशांची आणि कामगारांची वाढती गर्दी लक्षात घेता, भिवंडी-दिवा मेमू लोकल सेवा वाढवावी यासाठी आज माननीय रेल्वेमंत्री श्री. अश्विनी वैष्णव यांना खा.बाळ्या मामा म्हात्रे यांनी निवेदन सादर केले.

सकाळी ५ ते ११ आणि सायंकाळी ५ ते १० या वेळेत प्रति तास लोकल उपलब्ध करून द्यावी अशी स्पष्ट मागणी केली असून, तांत्रिकदृष्ट्या ही सेवा शक्य आहे असे या निवेदनात नमूद केले आहे.

> **दिवा, डोंबिवली, कोपर आणि भिवंडी या स्थानकांवरील हजारो प्रवाशांचा रोजचा प्रवास अधिक सुलभ आणि सुरक्षित करण्यासाठी हा निर्णय अत्यावश्यक आहे.**
> **- खा.बाळ्या मामा म्हात्रे**



## चिखलोली-अंबरनाथमध्ये उद्या नवीन न्यायालयाचे उद्घाटन

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर राहणार उपस्थित**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : चिखलोली-अंबरनाथ येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालयाच्या तसेच नूतन न्यायालयीन इमारतीचे उद्घाटन शनिवार, दि.9 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 10.30 वाजता मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गिरीष कुलकर्णी यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांची उपस्थिती असणार आहे. तर अध्यक्षपदी ठाणे जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीनिवास अग्रवाल हे असून उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्रीराम मोडक, न्यायमूर्ती श्रीमती मंजुषा देशपांडे आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील.

चिखलोली आणि आसपासच्या परिसरातील नागरिकांना न्याय मिळवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून या न्यायालयाकडे पाहिले जात आहे. या नवीन न्यायालयामुळे परिसरातील नागरिकांना जलद न्याय मिळण्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे. या उद्घाटन सोहळयास वकील, वकिलीचे विद्यार्थी, प्रसारमाध्यम प्रतिनिधी व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिखलोली-अंबरनाथ आणि उल्हासनगर तालुका बार ॲडव्होकेट्स फाऊंडेशनचे अध्यक्ष ॲड. संजय सोनवणे यांनी केले आहे.

## दळखण आणि खर्डीतील रस्त्यांवर व्यसनविरोधाचा जागर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : ७ ऑगस्ट २०२५ रोजी जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खर्डी येथील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने दळखण आणि खर्डी गावात मादक द्रव्यांच्या व्यसनाविरुद्ध जनजागृती रॅली आणि पथ नाटकाचे आयोजन करण्यात आले होते

या कार्यक्रमाद्वारे तरुणाईमध्ये व्यसनमुक्तीची जागरूकता निर्माण करण्याचा संदेश दिला गेला. स्वयंसेवकांनी गावातून घोषणाबाजी करत व्यसनमुक्तीचे महत्व सांगितले. "नशा नको – जीवनाला होकार", "तरुणाई वाचवा – व्यसन हटवा" अशा प्रभावी घोषणा दिल्या गेल्या.



रॅलीनंतर गावकऱ्यांसमोर सादर करण्यात आलेल्या संवेदनशील पथ नाटकाद्वारे व्यसनाचे दुष्परिणाम आणि त्यातून होणाऱ्या सामाजिक समस्या प्रभावीपणे मांडण्यात आल्या. प्रेक्षकांनी या नाटिकेला उदंड प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे आयोजन NSS चे कार्यक्रम अधिकारी प्रा. रसिका सकपाळ आणि प्रा. राहुल सोनावणे यांनी केले. या उपक्रमात स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग घेतला आणि दळखण व खर्डी परिसरातील जनतेमध्ये सकारात्मक संदेश रुजवला.

सदर कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे याच्या प्रेरणेने आणि मविद्यालयाचे प्राचार्य कैलास कळकटे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला . हा उपक्रम नशामुक्त भारताचे स्वप्न साकारण्यासाठी एक प्रभावी पाऊल ठरला आहे.

# जिल्हा परिषदेच्या सिद्धेश्वर शाळेला दीडशे वर्षे पूर्ण

## विविध सामाजिक उपक्रमाने वाढदिवस साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : राज्यात जिल्हा परिषदेच्या शाळा मराठी मुलांच्या कमतरतेमुळे बंद पडत असताना सिद्धेश्वर बुद्रुक या गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेने मात्र तब्बल दीडशे वर्षाचा शैक्षणिक प्रवास केलेला आहे . मोठ्या थाटामाटात उत्साह पूर्ण वातावरणात शाळेचा दीडशे वा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने ग्रामस्थांनी साजरा केला. यावेळी या विद्यालयात शिकलेले ज्येष्ठ काही निवडक विद्यार्थी या कार्यक्रमानिमित्त आवर्जून उपस्थित होते .समस्त सिद्धेश्वर ग्रामस्थांनी या शाळेचा शतकेतर वाढदिवस साजरा केल्याने जिल्हा परिषदेच्या शाळांची ओढ अद्यापही ग्रामीण भागात टिकून असल्याचे एक मूर्तीमंत उदाहरण आहे.

स्वतंत्र पूर्व काळात सुरू झालेल्या सुधागड तालुक्यातील सिद्धेश्वर बुद्रुक या गावात शिक्षणाची गंगा ग्रामीण भागापर्यंत यावी यासाठी तत्कालीन कुलाबा जिल्हा लोकल बोर्डाने शाळा सुरू केली होती.



सद्यस्थितीत असलेले रायगड जिल्हा परिषदेची प्राथमिक स्तरावरील शाळा ही ६ ऑगस्ट १८७६ रोजी स्थापन झाली. त्याकाळी प्रथम सिद्धेश्वर गावातील असलेल्या विठोबाच्या मंदिरामध्ये पहिली वहिली शाळा भरवली गेली. त्यानंतर विद्यार्थी संख्या वाढली आणि मग अर्धी शाळा सिद्धेश्वर गावातील ग्रामस्थ आनंद गद्रे यांच्या घरामध्ये भरावयास लागली. नंतर शाळेसाठी इमारत बांधण्यासाठी जागा स्नेहलता दुर्वे यांनी दान केली. दान मिळालेल्या जागेवर एक शाळेची छोटीशी सुंदर इमारत उभी राहिली त्यात काही वर्ग भरण्यास सुरुवात झाली. नंतर या शाळेचा इमारतीचा जिर्णोद्धार व पुनर्बांधणी रायगड जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेचे पहिले अध्यक्ष शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये यांच्या काळात करण्यात आली .सद्यस्थितीत शाळेची विद्यार्थी पटसंख्या ही ५२ आहे. शाळेचा स्तर आता केंद्रीय प्राथमिक शाळा म्हणून झालेला आहे. दीडशे वर्षाची परंपरा लाभलेल्या शाळेतून आजपर्यंत हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन देशाच्या कानाकोपऱ्यात तसेच परदेशामध्ये ही स्थायिक झालेले आहेत .या शाळेतून शिक्षण घेऊन मराठीचा डंका परदेशात तसेच इस्त्राईलमध्येही वाजत आहे. या शाळेतील शिकलेले ज्यू समाजाचे नागरिक भारत देशातून इस्रायलमध्ये विसावले आहे परंतु ते आपल्या मातृभाषेला विसरले नाहीत ते या शाळेमुळेच. या शाळेला ज्यावेळी शंभर वर्षे पूर्ण झाली तेव्हापासून आजतागायत सहा ऑगस्ट या दिवशी शाळेचा वाढदिवस साजरा केला जातो. यावर्षी शाळेला दीडशे वर्षे पूर्ण होत असल्याने शतकोत्तर सुवर्ण महोत्सव म्हणून हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात करण्याचे वर्धापन दिन कमिटीने अन सिद्धेश्वर ग्रामस्थांनी ठरविले. यावेळी या शाळेमध्ये शिकलेले माजी विद्यार्थी विलास काका दुर्वे व नंदकुमार सुरावकर हे या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. त्यांनी त्यांच्या वेळी असलेल्या शिक्षण पद्धती कडक शिस्तीचे गुरुजी यांची माहिती ही उपस्थित विद्यार्थी आणि नागरिकांना दिली .सध्या शाळेमध्ये मुलांना फिल्टर पाणी व्यवस्था कार्यान्वित करण्यात आली आहे तर शाळेच्या माजी विद्यार्थी साक्षी यादव यांनी पूर्ण शाळेला इन्व्हर्टर देणगी म्हणून दिलेले आहे. शाळेसाठी चार कम्प्युटर सेट ,शाळेला पूर्ण वॉल कंपाऊंड वेगवेगळे दुर्मिळ जातीचे वृक्ष लागवड रंगरंगोटी अशा माध्यमातून आज शाळा दिमाखात उभी आहे . विविध रांगोळीच्या साड्यांनी शाळा सुशोभित केली होती . ढोल ताशांच्या गजरात वाजत गाजत या शाळेचा वाढदिवस दिमाखात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून माजी विद्यार्थी विष्णू मंचेकर हे होते .तसेच या कार्यक्रमासाठी गटविकास अधिकारी लता मोहिते, गटशिक्षण अधिकारी साधुराम बांगारे, सुधागडचे तहसीलदार उत्तम कुंभार, केंद्रप्रमुख कैलास म्हात्रे तसेच उद्योजक चंद्रशेखर दुर्वे, परमानंद राइलकर ,नगरसेवक मुंबई दत्तात्रय पोंगडे , तसेच राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेले सगळेच माजी विद्यार्थी, महिला विद्यार्थिनी ग्रुप ग्रामपंचायत सरपंच आशिकाताई पवार, उपसरपंच शरद किंजावडे ,सदस्या समृद्धी यादव सर्व गावातील ग्रामस्थ तरुण मंडळी अशा सगळ्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्रमांक दोन मधून शाळेला दोन लाखाचे बक्षीस ही प्राप्त झाले आहे. वर्धापन दिन कमिटी अध्यक्ष अविनाश कोनकर, उपाध्यक्ष संजय शिंदे, श्रीपत पवार कृष्णा वाघमारे , शाळा व्यवस्थापन कमिटी अध्यक्ष रवींद्र यादव ,सचिन मुंढे ,आशिष पोंगडे ,नितीन यादव, वर्षा सुरावकर ,सौरखा यादव ,संतोष यादव, संतोष जाधव या सर्वांनी मेहनत घेऊन शाळेचा दीडशे वा वाढदिवस मोठ्या उत्साह पूर्ण वातावरणात विविध सामाजिक उपक्रमाने आयोजन करून करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश सुरावकर ,जनार्दन भिलारे यांनी केले.

# वन हक्क दावेदारांना मिळाला न्याय : ठाण्यात महसूल सप्ताहात १८४ दाव्यांची मोजणी पूर्ण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख नितीन पाटील यांच्या सूचनेनुसार आणि उपअधीक्षक भूमी अभिलेख सचिन वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल सप्ताहादरम्यान एक महत्त्वाचे काम पूर्ण झाले आहे. ठाणे तालुक्यातील 5 गावांमध्ये एकूण 184 वन हक्क दावेदारांच्या वन हक्कांची प्रत्यक्ष जागेवर मोजणी करण्यात आली. या मोजणीसाठी सर्व दावेदार आणि श्रमजीवी संघटनेने सहकार्य केले, ज्यामुळे हे काम वेळेत पूर्ण होऊ शकले.

या विशेष मोहिमेमुळे वन हक्क दावेदारांच्या हक्कांची अचूक नोंदणी होण्यास मदत मिळणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या दाव्यांवर आता कारवाई सुरू झाल्याने त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. महसूल सप्ताहाचा उद्देश अशा प्रलंबित कामांना गती देणे आणि नागरिकांना तातडीने न्याय मिळवून देणे हाच असतो, आणि ठाण्यातील या कामगिरीने तो उद्देश यशस्वी झाल्याचे दिसून आले. या मोजणीमुळे आता पुढील कार्यवाहीचा मार्ग मोकळा झाला असून, लवकरच वन हक्क धारकांना त्यांच्या जमिनीचे अधिकार मिळण्याची अपेक्षा आहे. वन हक्क दावेदारांनी या कामगिरीबद्दल प्रशासनाचे आभार मानले आहेत.

# सनातन संस्थेला 'दहशतवादी' म्हटल्याप्रकरणी पृथ्वीराज चव्हाण यांना मानहानीची नोटीस



## बिनशर्त माफी मागा अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जा - सनातन संस्थेचा पृथ्वीराज चव्हाण यांना इशारा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : नुकताच मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाचा निकाल लागला. त्यानंतर 'भगवा दहशतवादा'च्या काँग्रेसी षड्यंत्राचा बुरखा फाटला. त्यानंतर सारवासारव करतांना काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी आधी 'भगवा दहशतवाद' म्हणू नका, तर 'सनातनी दहशतवाद' म्हणा, असे म्हणत सनातन धर्मावर पुन्हा टीका केली. त्याविषयी स्पष्टीकरण देतांना त्यांनी धर्माला नव्हे, तर मी सनातन संस्थेला 'आतंकवादी संघटना' म्हणाले, असे वक्तव्य केले. हे वक्तव्य खोटे, बिनबुडाचे आणि दिशाभूल करणारे असून या प्रकरणी सनातन संस्थेचे विश्वस्त वीरेंद्र मराठे यांच्या वतीने त्यांना १० कोटी रुपयांची मानहानीची नोटीस पाठवण्यात आली आहे. तसेच पृथ्वीराज चव्हाण यांनी सनातन संस्थेची बिनशर्त माफी मागावी अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी, असा इशारा सनातन संस्थेचे प्रवक्ते अभय वर्तक यांनी दिला आहे.

या नोटिसीमध्ये पृथ्वीराज चव्हाण यांनी १५ दिवसांच्या आत लेखी माफी मागणे, मूळ मुलाखतीइतक्याच प्रसिद्धीने ती माफी प्रसिद्ध करणे, भविष्यात कोणतीही बदनामीकारक विधाने न करणे आणि १० हजार रुपये कायदेशीर खर्च भरपाई देणे, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. संस्थेचे मानद कायदेशीर सल्लागार तथा मुंबई उच्च न्यायालयाचे अधिवक्ता रामदास केसरकर यांनी नोटिशीत म्हटले आहे की, चव्हाण यांच्या वक्तव्यामुळे सनातन संस्थेची प्रतीमा मलीन झाली असून हजारो साधकांच्या भावना दुखावल्या आहेत. ही नोटीस मिळूनही उत्तर न दिल्यास चव्हाण यांच्यावर फौजदारी आणि दिवाणी खटले दाखल करण्यात येणार आहेत.

या विषयी अधिक माहिती देतांना अभय वर्तक पुढे म्हणाले की, पृथ्वीराज चव्हाण आज सांगत आहेत की, 'भगवा' हा महाराष्ट्राच्या मराठी संस्कृतीचा, छत्रपती शिवरायांचा, संत ज्ञानेश्वरांपासून सर्व संत आणि वारकऱ्यांचा पवित्र भगवा आहे. त्यामुळे कोणीही "भगवा दहशतवाद" असे कोणी म्हणू नये, असे काँग्रेसी नेत्यांना आवाहन करत आहेत; पण जेव्हा मालेगाव प्रकरण झाले, त्या वेळी काँग्रेसी नेते पी. चिदंबरम्, दिग्विजय सिंह, सुशीलकुमार शिंदे आदी नेत्यांनी यथेच्छ 'भगवा दहशतवाद' म्हणत हिंदूंना लक्ष्य केले. तेव्हा चव्हाण यांना 'भगवा' छत्रपतींचा आहे, संतांचा आहे, हे लक्षात आले नाही का? इतकी वर्षे ते झोपले होते का?, असेही वर्तक यांनी म्हटले आहे.

# केडीएमसीची 'हरित बाप्पा/फलीत बाप्पा' संकल्पना

## पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या जनजागृतीसाठी कार्यशाळा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : पर्यावरणपूरक श्री गणेशोत्सवाची अधिकाधिक जनजागृती व्हावी आणि जनमानसाने आगामी गणेशोत्सवाच्या कालावधीत शाडू मातीच्या मुर्तीची प्रतिष्ठापना करावी या हेतूने महानगरपालिका "हरित बाप्पा/फलीत बाप्पा" ही संकल्पना राबवित असून महानगरपालिका व एज्युकेशन टुडे फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि.12 ऑगस्ट 2025 रोजी डोंबिवली पूर्व येथील वै.ह.भ.प संत सावळाराम महाराज क्रिडा संकुलांच्या कै. सुरेंद्र वाजपेयी सभागृहात एका भव्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत आहे. ही कार्यशाळा दोन सत्रात होणार असून या कार्यशाळेत महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे 4,000 विद्यार्थी उपस्थित राहण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. ही कार्यशाळा




विद्यार्थ्यांसाठी एक समृद्ध अनुभव ठरणार आहे. या माध्यमातून विद्यार्थी शाडू माती आणि नैसर्गिक रंगाचा पर्यावरणपूरक वापर करीत पारंपारिक कला सांस्कृतिक मुल्ये आणि निसर्ग संवर्धनाची जाणीव आत्मसात करतील अशी माहिती या कार्यशाळेच्या प्रकल्प प्रमुख तथा कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे यांनी आज मा. आयुक्त महोदय यांचे दालनात संपन्न झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

शालेय विदयार्थ्यां मार्फत, त्यांचे पालकांमार्फत, त्यांचे शिक्षकांमार्फत पर्यावरण पूरक गणेशोत्सवाचा संदेश सर्वत्र जाण्यासाठी हे शालेय विदयार्थी स्वत: श्री गणेशाची शाडुची मुर्ती साकारणार आहेत. त्यासाठी लागणारी शाडूमाती महानगरपालिकेमार्फत पुरवली जाणार आहे,श्री गणेश मंडळांनी शक्य असेल तर 6 फुटापेक्षा कमी पर्यावरण पूरक गणेश मुर्तीची प्रतिष्ठापना करावी, विसर्जनासाठी 6 फुटापेक्षा कमी उंचीच्या गणेश मुर्तीचे विसर्जन कृत्रिम तलावात करावे आणि शक्यतोवर पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा असे आवाहन महानगरपालिकेचे आयुक्त अभिनव गोयल यांनी यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना केले.

शासनाच्या "घरोघरी तिरंगा" उपक्रमातंर्गत शालेय विद्यार्थ्यांमार्फत रांगोळी काढणे, राखी तयार करणे, जवानांना पत्र लिहीणे असे अनेक उपक्रम राबविले जात असून येत्या रविवारी म्हणजेच दि.10 ऑगस्ट 2025 रोजी या उपक्रमातंर्गत सायकल रॅलीचे आयोजन सकाळी 6.30 वाजता करण्यात आले आहे. अधिकाधिक नागरिकांनी "घरोघरी तिरंगा" अभियानात सहभागी होऊन पुढाकार घ्यावा असेही आवाहन महानगरपालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी केले.



प्रति गाणगापूर
प.पू.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर (तानसा), ता. शहापूर, जि.ठाणे





**यात्रेचा अर्थ इंद्रियांना प्रतिकूल विषयांपासून हरवून अनुकूल विषयांकडे लावून देणे म्हणजेच यात्रा होय. तीर्थयात्रा त्याची सफल झाली अशी समजावी की जो तीर्थासारखा पवित्र होऊन तेथून परततो. कित्येक वेळा तर माणूस यात्रा करता करता पापाचे गाठोडे सोबत बांधून आणतो. यात्रेला निघण्यापूर्वी प्रतिज्ञा करावयास पाहिजे की, मी कधीही वाईट गोष्टींच्या अधीन जाणार नाही, खोटे बोलणार नाही, कधी रागवणार नाही, व्यर्थ भाषण निंदा नालस्ती करणार नाही... अश्या प्रकारे प्रतिज्ञा करूनच यात्रा सुरू करावी. आजकाल तर यात्रेचे निमित्त करून काही लोक सफर करण्यास निघतात. याप्रमाणे तर कावळाही काशी- मथुरेची चक्कर मारू शकतो. तीर्थावर खऱ्या साधू संतांची निंदा करणाऱ्यांना तीर्थयात्रेचे पुण्य मिळत नसते. साधुसंतांबद्दल सद्भाव नसेल तर तीर्थयात्रा विफल होत असते.**

गुरूमाऊली - प.पू.स.अलोकनाथजी महाराज
मो.नं.7038727403/9890226862


# नागरिकांना प्रकल्पाची माहिती द्यावी अन्यथा लोकशाही मार्गाने लढा उभारणार- खारेपाट विकास संकल्प संघटना

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण व अलिबाग तालुक्यातील जनतेच्या दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम करणाऱ्या JSW च्या फेज तीनचा विस्तार प्रकल्पा संदर्भात नागरिकांना कोणतीही अधिकृत माहिती दिली जात नसल्याने जनतेमध्ये तीव्र संताप आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर 'खारेपाट विकास संकल्प संघटना' या स्थानिक नागरी सामाजिक संघटनेने प्रशासनास अधिकृतपणे पत्राद्वारे मागणी केली आहे की सदर प्रकल्पाची सविस्तर माहिती नागरिकांना द्यावी, अन्यथा जनतेला कायदेशीर मार्गाने व लोकशाही मार्गाने लढा उभा करावा लागेल.

या प्रकल्पामुळे परिसरातील पर्यावरण, आरोग्य, वाहतूक आणि पाण्याच्या स्त्रोतांवर परिणाम होणार असून, या प्रकल्पामध्ये नेमक्या कोणत्या सुविधा, किती जागेचा विस्तार, कोणते उद्योग आणि किती प्रदूषण होणार, भविष्यातिल प्रदूषणाची व जनतेच्या आरोग्याची स्थिती काय असेल याची सविस्तर माहिती अजूनही नागरिकांच्या समोर आलेली नाही, त्यामुळे 22 ऑगस्ट 2025 रोजी आयोजित सार्वजनिक पर्यावरणीय सुनावणी संदर्भात मिळालेल्या अधिकृत-जाहीर नोटीसमुळे जनतेच्या मनात संभ्रम व आरोग्या विषयी चिंता आहे.

पेण खारेपाट विकास संघटनेने प्रशासनाला स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे की, या प्रकल्पाची माहिती दिली नाही तर माहिती अभावी गैरसमज व संताप वाढून बाधित 32 ग्रामपंचायती व आजूबाजूच्या परिसरात मोठे जनआंदोलन उभे राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रशासनाने नागरिकांच्या शंका दूर करण्यासाठी सात दिवसांत अधिकृत बैठक आयोजित करून, संबंधित ग्रामपंचायती, सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक लोकप्रतिनिधी व पत्रकारांच्या उपस्थितीत प्रकल्पाबाबत सविस्तर माहिती द्यावी, अशी मागणी संघटनेमार्फत प्रशासनाला करण्यात आली आहे.

ही केवळ औपचारिक सुनावणी नसून, परिसरातील नागरिकांच्या आरोग्य व उपजीविकेचा हा थेट प्रश्न असल्याने प्रशासनाने पारदर्शकतेने व उत्तरदायित्वाने माहिती देणे बंधनकारक आहे, असा ठाम संदेश यानिमित्ताने देण्यात आला आहे. तसेच प्रशासनाची भूमिका स्पष्ट करण्यासाठी स्थानिक वृत्तपत्रांतून अधिकृत निवेदन प्रसिद्ध करण्याची मागणीही संघटनेने मार्फत करण्यात आली आहे.

या मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर पर्यावरण संरक्षण कायद्यान्वये कायदेशीर लढा उभा करण्या शिवाय पर्याय राहणार नाही, अशी ठाम भूमिका संघटनेने घेतली आहे. लोकशाही व कायद्याच्या मूल्यांचा अवमान करून जनतेला अंधारात ठेवण्याचे प्रयत्न खपवून घेतले जाणार नाहीत, असा इशारा यानिमित्ताने देण्यात आला आहे.

सदर मागणीचे पत्र अध्यक्ष- प्रकाश माळी, सचिव- सी.आर. म्हात्रे, आणि राजेंद्र झेमसे (सह-सचिव) यांच्या स्वाक्षरीने प्रशासनाला पाठवण्यात आले आहे. याची प्रत जिल्हाधिकारी, रायगड व उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-२ यांनाही पाठवण्यात आली आहे.

# वृक्षारोपणातुन हरितक्रांतीचा वसा

## गाला प्रिसीजन इंजिनिअरिंगचा स्तुत्य उपक्रम



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कुडूस : गाला प्रिसीजन इंजिनिअरिंग कंपनीच्या वतीने वाडा तालुक्यातील मुसारणे गावच्या हद्दीतील पराग पाटील यांच्या जागेत वृक्षारोपणाचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत फळझाडांसह पर्यावरणास लाभदायक अशा ऑक्सिजन देणाऱ्या विविध वृक्षप्रजातींचा समावेश करण्यात आला आहे.

पडीक जमीनीवर वृक्षारोपण करून हिरवळीत रूपांतरित करत असताना एक सुंदर वनराई उभारण्याचा मानस असल्याची माहिती कंपनीचे अधिकारी तुकाराम बेहेरे यांनी दिली. हे वृक्ष केवळ सौंदर्यवृद्धी न करता पर्यावरण संतुलन राखण्यासही मोलाचे ठरणार आहेत. स्थानिक पातळीवर समाजहिताचे कार्य करणे हीच आमची जबाबदारी आहे, असे गालाचे बेहेरे यांनी सांगितले.

या वेळी गाला प्रिसीजन इंजिनिअरिंग कंपनीच्या वतीने अवधूत पणशीकर, योगिता भोर, राजेंद्र मोरे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते जयेश घोडविंदे, पराग पाटील उपस्थित होते. स्थानिक ग्रामस्थांनी या उपक्रमाचे कौतुक करत भविष्यातही असे उपक्रम नियमित राबवावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

# अनखरपाडा येथे शेतकरी प्रशिक्षण संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन योजनेअंतर्गत अनखरपाडा येथे शेतकरी प्रशिक्षण घेण्यात आले त्यामध्ये शुभांगी नेवरेकर सहाय्यक कृषी अधिकारी बापसई यांनी जैविक पद्धतीने कीड नियंत्रण कसे करावे याविषयी मार्गदर्शन केले. प्रवीण




बिऱ्हाडे,उपकृषी अधिकारी मामनोली यांनी कृषी विभागाच्या योजनेविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. वैशाली भापसे तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांनी जीवामृत तयार करणे याबाबत प्रात्यक्षिक करून दाखवले.सदर प्रशिक्षणासाठी कृषी सखी पूजा धुमाळ, नाथा धुमाळ ,विश्वनाथ धुमाळ ,चंद्रकांत केसरकर,व गटामधील सदस्य उपस्थित होते. सदर प्रशिक्षणाचे आयोजन मा. रामेश्वर पाचे ,प्रकल्प संचालक आत्मा,ठाणे, सूर्यकांत कांबळे तालुका कृषी अधिकारी कल्याण व रवींद्र घुडे, मंडळ कृषी अधिकारी, कल्याण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

**प्रवीण बिऱ्हाडे, उपकृषी अधिकारी मामनोली यांनी कृषी विभागाच्या योजनेविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.**

# स्वातंत्र्य दिनी केडीएमसी क्षेत्रातील सर्व कत्तलखाने राहणार बंद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शेळ्या मेंढया कोंबड्यांची तसेच मोठ्या जनावरांची कत्तल, मांसाची विक्री करणा-या खाटीक कसाई व अधिकृत परवानाधारकांना कळविण्यात आले आहे की, १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त कल्याण डोंबिवली महानगरपालीका क्षेत्रातील सर्व लाहान व मोठ्या जनावरांचे कत्तलखाने बंद ठेवण्यात येणार आहेत. तरी गुरुवार दि. १४ ऑगस्टच्या रात्री १२ वाजल्यापासून ते दि. १५ ऑगस्टच्या रात्री १२ वाजेपर्यंतच्या काळात कोणत्याही प्रकारच्या प्राण्यांची कत्तल करु नये असे आदेश केडीएमसीने काढले असून, या कालावधीमध्ये जनावरांची कत्तल अथवा मांसविक्री केल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३३४,३३६, व ३७४ (अ) अन्वये कारवाई करण्यात येईल, याची नोंद घेण्याचे आवाहन केडीएमसीच्या बाजार परवाना विभागाच्या उपायुक्तांनी केले आहे.

# डॉ. सुनील खर्डीकर महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील मान्यवर आणि समाजासाठी विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तींना महाराष्ट्र टाईम्स, नवभारत टाइम्स आणि टाईम्स इंटरएक्टच्या माध्यमातून सन्मानित करण्यासाठी महाराष्ट्र गौरव दिला जातो. या निमित्ताने मुंबई सह राज्यभरातील कला, साहित्य, क्रीडा, शैक्षणिक, राजकारण, समाजकारण, उद्योग आदी क्षेत्रात उंच भरारी घेणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. डोंबिवलीतील खर्डीकर क्लासेसचे संस्थापक डॉ.सुनील खर्डीकर यांचाही 'महाराष्ट्र गौरव 2025' पुरस्काराने सन्मान करण्यात



आला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात आले. या पुरस्कार सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून सिने अभिनेते पुष्कर श्रोत्री, रजनिश दुगल, शान ग्रोवर, शालिनी केडीया आदी दिगग्ज मान्यवर उपस्थित होते.

अभिनेता पुष्कर श्रोत्री यांनी देखील खर्डीकर यांचे अभिनंदन करीत खर्डीकर क्लासेसचेही कौतुक करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. शिक्षणा प्रति तुमचा असलेला दृष्टीकोन हा खरोखरच वाखानण्याजागा असल्याचे यावेळी अभिनेते श्रोत्री म्हणाले. डॉ. सुनील खर्डीकर यांच्या शिक्षण क्षेत्रातील ३१ वर्षांच्या अविरत कार्यामुळे १०० हून अधिक सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक संस्थांनी त्यांना आतापर्यंत सन्मान चिन्ह देऊन गौरवले आहे. खर्डीकर शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून त्यांनी वाडा, मोखाडा, जव्हार, पालघर, तलासरी सारख्या दुर्गम खेडोपाड्यातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप केले आहे. त्यांच्या या अविरत कार्याची दखल घेऊन त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.


जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
**जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित

**प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!**

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी

संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे

Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558


# गणेशोत्सवापूर्वी मुंबई-गोवा महामार्ग खड्डेमुक्त होणार

## - सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांना रस्त्यांवरील खड्ड्यांचा जो त्रास होतोय, तो त्रास होवू नये, यासाठी शासनाकडून सर्व प्रकारच्या उपाययोजना करण्यात येत आहेत. गणेशोत्सवापूर्वी मुंबई-गोवा महामार्ग खड्डेमुक्त करण्याचा आमचा मानस असल्याचे प्रतिपादन सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज येथे केले.

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज मुंबई गोवा महामार्गावरील सुरू असलेल्या रस्त्याच्या कामांची पाहणी केली, त्यावेळी ते बोलत होते. मुंबई गोवा महामार्गावरील कामाची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले रायगड आणि रत्नागिरी जिल्हा दौऱ्यावर आहेत. पनवेल येथील पळस्पे फाटा येथून या पाहणी दौऱ्यास सुरुवात झाली. या पाहणी दौऱ्यावेळी त्यांच्या समवेत आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आम.रविद्र पाटील, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग एम.एन.राजभोज, अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ कोकण भवन सुषमा गायकवाड, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे प्रकल्प संचालक यशवंत घोटकर आदि उपस्थित होते.

महाड येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित आढावा बैठकीत ते म्हणाले की, मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाची कामे प्राधान्याने पूर्ण करावीत, प्रवास करताना नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास होणार नाही याची खबरदारी घ्यावी अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. मुंबई-गोवा महामार्गाचा पाहणी दौरा सुरु असून नागरिकांना आवश्यक सुविधांमध्ये सुधारणा करण्यावर राज्य शासनाकडून भर देण्यात येत असून महामार्गाचे काम दर्जेदार झाले पाहिजे आणि लवकर पूर्ण झाले पाहिजे यासाठी निश्चितच प्रयत्न केला जात आहे.

### पळस्पे ते कशेडी बोगदा रस्त्याची केली पाहणी

रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी तसेच खड्ड्यांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यास सुरुवात केली आहे. या माध्यमातून मुंबई-गोवा महामार्ग खड्डेमुक्त करण्याचा तसेच उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. इंदापूर व माणगाव बायपास पुलाच्या निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून या कामासाठी नवीन ठेकदारांची नेमणूक करण्यात आली असून हे काम पूर्ण होण्याकरिता किमान एक वर्षाचा कालावधी लागू शकतो असेही त्यांनी यावेळी सांगितले.

कोकणात जाणारे पर्यायीमार्ग (खोपोली पाली) सुस्थितीत करावेत. इंदापूर, माणगाव येथे जास्तीचा पोलिस बंदोबस्त लावावा. होमगार्डची मदत घ्यावी. मुरुड,अलिबाग जाणाऱ्या नागरिकांसाठी वडखळ अलिबाग रस्त्याची दुरुस्ती करून घ्यावी. गणेशोत्सव हा कोकणातील लोकांचा जिव्हाळ्याचा विषय असून त्यांना प्रवासात कोणत्याही अडचणी येऊ नयेत संबंधित अधिकारी यांना दिलेल्या सूचनांचे पालन करावे यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे. गणेशोत्सव काळात मुंबई-गोवा महामार्गावर सुविधा केंद्र उभारुन त्या सुविधा केंद्रावर नागरिकांना जास्तीत जास्त सुविधा द्याव्यात.जिथे पुलांची कामे चालू आहेत तेथील सर्विस रोडवर वाहतुक सुरळीत राहतील यासाठी प्राधान्याने कामे पूर्ण करावीत. जिथे गरज आहे तिथे साईन बोर्ड, साईन व्हेजेस, रिफ्लेक्टर बसवावेत.

या पाहणी दौऱ्यात मंत्री श्री.भोसले यांनी पळस्पे, जिते पेण, पेण रेल्वे स्टेशन, वाशीनाका, गडब, खारपाले, कोलेटी या विविध ठिकाणी सुरु असलेल्या कामांची पाहणी केली. यावेळी स्थानिक नागरिकांशी संवाद साधला. त्यांना येणाऱ्या समस्या जाणून घेतल्या. या समस्या सोडविण्यासाठी सर्वोतोपारी सहाय्य करण्यात येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी मुंबई-गोवा महामार्गाच्या सद्य:स्थितीबाबतची माहिती संगणकीय सादरीकरण द्वारे उपस्थितांना दिली. या पाहणी दौ-यावेळी उपविभागीय अधिकारी,तहसिलदार तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

*Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN, printed at Thane and published at Building No-B-24,Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan west editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.*